ISSN : 2278-8204

International Monthly Research Journal For All Subjects

# AKSHARDEEP



Editor

**Ganpu Lahane**

UGC ~~conf. paper~~ R. paper may 14 AY 13-14

Principal
Nutan Mahavidyalaya, Selu (MS)

Scanned by CamScanner



**Sankalp Prakashan,**
Kasturi Nagar, Lahoti Compound,
Latur

ISSN : 2278-8204

Principal
Nutan Mahavidyalaya,Selu (MS)

Scanned by CamScanner

Research Paper
In
History

International Monthly
Research Journal,
Akshardeep

26
ISSN 2278-8204
Vol.II. Issue : XI,
May, 2014

NUTAN MAHAVIDYALAYA SAILU

# माहुरगडची रायबागण सावित्रीबाई देशमुख व उंवरखिंडची लढाई

संशोधक
प्रा. दत्ता उध्दव जाधव
इतिहास विभाग प्रमुख
श्री. रेणुकादेवी महाविद्यालय, माहुर
ता. माहुर जि. नांदेड

मार्गदर्शक
डॉ. यु. सी. राठोड
नुतन महाविद्यालय, सेलु परभणी

रायबागण सावित्रीबाई देशमुख यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील कवणे गावातील देशपांडे यांची मुलगी होती. देशपांडे घराण्यात संत एकनाथ महाराज यांची नात दिलेली होती. रायबागण सावित्रीबाई देशमुख यांचे घराणे एक सरदार घराणे होते. कृष्णकांत देशपांडे कवाणे गावाचे देशमुख म्हणुन पेशव्यांच्या काळात नावाजले होते. कवाणे गावात शनिवार वाड्याच्या प्रतिरूप वाडा आणि वास्तु उभी आहे. या घराण्याचाही इतिहासात जास्त उल्लेख मिळत नाही. रायबागण सावित्रीबाई देशमुख यांचे माहेर असलेले देशपांडे घराण्याकडे मोगल काळात वतनदारी होती असे दिसते. देशपांडे घराणे पूर्वी अमरावतीकडील एका खेड्याचे राहणारे होते. नंतर त्यांना कवाणे या गावाची देशमुखी व जहागिरी मिळाली असावी म्हणून ते इकडे आलेले दिसतात.

रायबागण सावित्रीबाई देशमुख यांचे सासर असलेले उदाराम घराणे पूर्वी अमरावतीच्या जवळपास असलेले वाशिमचे होते. म्हणून त्यांची ऐकमेकांची ओळख झालेली असावी. म्हणूनच हेही घराणे नातेसंबंधात जोडले गेले होते. जेव्हा या दोन्ही घरण्याकडे अमरावती आणि वाशिमकडील पाटिलकी होती हे घराणे अतिशय हलाखिचे जीवन जगत होते. उध्दव रामजी देशमुख यांचा प्रारंभिक काळ गरिबीत गेला असे उल्लेख अनंत कविच्या भक्तरहस्य या अप्रकाशित ग्रंथात आलेल्या उल्लेखातून दिसते. मोगलाईच्या काळात उदाराम घराण्याला भरभराट आली व माहुर-वाशिमपर्यंतच्या प्रदेशाचे जहागिरदार झालेले होते. त्याचप्रमाणे कवाणे गावाचे देशपांडे घराणे कृष्णराज यांच्या काळात भरभराटीस आले असावे.

माहुरचे उदाराम देशमुख आणि सिंदखेडचे लखुजी जाधव या दोघा घराण्याचा वऱ्हाडात उदय झालेला होता. एखादे कुटुंब जसजसे श्रीमंत होत जाते तसतसे त्याची सामाजीक प्रतिष्ठा वाढत जाते. राजघराण्याच्या काळातील मंडळही त्याच्याशी सोयरीक करतात. मोगलाच्या काळात महाराष्ट्रात सिंदखेडचे लखुजी जाधव आणि उध्दव रामजी देशमुख या दोघा सरदारांचे घनिष्ट संबंध होते. तंजावरच्या ब्रुहध्दीश्वर शिलालेखात उदारामाला लखुजी जाधवाचे पुत्र म्हणून उल्लेख केलेला दिसतो. उदाराम हा लखुजी जाधवाचा पुत्र नव्हता. पण लखुजी जाधव हे उदारामाला पुत्राप्रमाणे प्रेम करीत होते. बऱ्याच ऐतिहासिक घटनेत या दोघांचा उल्लेख एकदाच येतो. दोघा घराण्यात व्यावहारीक संबंध चांगले होते असे दिसते. तत्कालिन जाती व्यवस्थेनुसार उदाराम घराणे ब्राह्मणाचे होते असे दिसते. म्हणून या दोन्ही घराण्यात नाते संबंध झालेले दिसत नाही. रायबागण सावित्रीबाई देशमुख यांचा जन्म इ. स. १६२६ ला कवाणे गावात देशपांडे घराण्यात झालेला असावा. याबद्दल लेखी पुरावा मिळत नाही. शिवाजी महाराज आणि रायबागण भेट झाली तेव्हा शिवाजी महाराजांनी तिला आपली बहीण म्हणून उल्लेख केलेला आहे.

म्हणजेच ती त्यांस समवयस्क असावी. इ. स. १६२४ ला राजे जगजीवनरामाचा जन्म झाला होता. तर त्यापेक्षा दोन वर्षानंतर तिचा जन्म झाला असावा. रायबागण सावित्रीबाई देशमुख यांचा जन्म इ. स. १६२६ ला झाला असावा असे दिसते. जिजाऊ आणि शाहाजी राजे यांच्याही जन्माची फरक दोन वर्षे गृहीत धरण्यात आली

Principal
Nutan Mahavidyalaya, Selu (MS)

Scanned by CamScanner